**स.फौ.के. नं. २१४/२०२४**

**नि. क्र. २४**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – संदेश सिताराम जाधव,

**वय** – ४९ वर्षे, **व्यवसाय** – नोकरी (पो.ह./५८),

**सध्या नेमणूक** – पोलीस ठाणे संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१.** दिनांक २१/०७/२०२४ रोजी मी पोलीस ठाणे देवरुख अंतर्गत साखरपा पोलीस दुरक्षेत्र येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन या पदावर कार्यरत होतो. त्यादिवशी मी ठाणे अंमलदार म्हणुन कार्यरत असताना पो.हे.कॉ. श्री. संजय करांडे यांनी दिलेली तक्रार मी नोंदविलेली होती. *(साक्षीदारास निशाणी क्रमांक १५ कडील फिर्याद दाखविली)*. ती तीच असून त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदर फिर्यादीवरुन घटनेचा प्राथमिक अहवाल क्रमांक ७९/२०२४ नोंदविण्यात आला होता. *(साक्षीदारास निशाणी क्रमांक १४ कडील घटनेचा प्राथमिक अहवाल दाखविला)*. तो तोच असून त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे.

**०२.** त्यानुसार दाखल झालेल्या गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील यांच्या आदेशान्वये जावक क्रमांक ३४६१/२०२४ नुसार माझ्याकडे सूपूर्त करण्यात आला. *(साक्षीदारास तपासाचा लेखी आदेश दाखविला)*. तो तोच असून त्यावर माझी व सहा. पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. *(सदर **लेखी आदेशास निशाणी २५** देण्यात येते)*.

**०३.** त्यानंतर, मी जप्त मुद्देमालाची मुद्देमाल पावती तयार सदरचा मुद्देमाल मी

कारकुनाच्या ताब्यात दिला. *(साक्षीदारास मुद्देमाल पावती दाखविली).* ती तीच असून त्यावर माझी व मुद्देमाल स्वीकारणाऱ्याची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. *(सदर* ***दस्तास निशाणी २६*** *देण्यात येते).*

०४. त्यानंतर, मी आरोपीला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५(३) अन्वये, नोटीस दिली होती. *(साक्षीदारास सदर नोटीस दाखविली). ती तीच असून त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५(३) अन्वये, नोटीसला* ***निशाणी क्रमांक २७*** *देण्यात येते).*

०५. त्यानुसार आरोपी हजर राहिल्याने मी त्यास पोहोच पावती दिली होती. *(साक्षीदारास सदर पोहोच पावती दाखविली). ती तीच असून त्यावर माझी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. (सदर दस्तास* ***निशाणी क्रमांक २८*** *देण्यात येते).* साक्षीदारांचे चौकशी करुन त्यांचे तपासटिपण नोंदविले.

०६. पोलीस शिपाई श्री. वैभव नटे यांनी घटनास्थळाची छायाचित्रे व भा.सा.अ.क. ६३(४) अन्वये, प्रमाणपत्र माझ्याकडे जमा केले. *(साक्षीदारास प्रकरणातील वस्तु – अ कडील छायाचित्रे दाखविली). त्यावर माझी सही आहे. सदर छायाचित्रांमध्ये आरोपी, दोन पंच, साक्षीदार – विनोद राजाराम चव्हाण व पोलीस असे दिसुन येत आहेत. (सदर* ***छायाचित्रांना एकत्रीतपणे निशाणी क्रमांक २९*** *देण्यात येते).*

०७. नमुना मुद्देमालाची बाटली रासायनिक पृथःकरणाकरीता कोल्हापुर येथील प्रयोगशाळेत पोलीस शिपाई/८२८ श्री. पी. एन. संकपाळ यांच्या मार्फत पाठविण्यात आली. *(साक्षीदारास सदरचे पत्र दाखविले). त्यावर माझी, सहा. पोलीस निरीक्षक श्री संजय पाटील व वरिष्ठ लिपीक प्रादेशीक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कोल्हापुर यांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक ३०*** *देण्यात येते).*

०८. त्यानंतर, साक्षीदारांची तपासटिपणे नोंदविली. आरोपीविरुध्द सबळ पुरावा आल्याने त्याच्याविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपी व मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखू शकतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे. *(मुद्देमाल*

*न्यायालयात जमा नाही).*

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेकडून–**

**०९.** हे म्हणणे खरे आहे की, सरकारी वाहनाचा लॉगबुगचा उतारा मी हजर केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, बौध्दवाडी, ओझरे बुद्रुक येथे राहती लोकवस्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, रासायनिक विश्लेषणाच्या अहवालाशिवाय एखादा द्रव पदार्थ दारुच आहे अगर कसे याबाबत निश्चीत सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, बेवारस मिळुन आलेला मुद्देमाल असताना तो आरोपीच्या ताब्यात मुद्देमाल मिळून आल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, तेथे त्याबाबत पंचनामा केला असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याच्या ताब्यात कोणताही मुद्देमाल मिळून आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटाच तपास केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटेच दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2026.04.17 16:55:13 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,

जि. रत्नागिरी.

दिनांक –१७.०४.२०२६

स्थळः देवरुख

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 17/04/2026 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 17/04/2026 |
| Evidence uploaded on | : | 17/04/2026 |